# चिनी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांना ताकीद



**बीजिंग :** तुलनेने स्वस्त शिक्षण देणाऱ्या चिनी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन चीनमध्ये घेतलेल्या वैद्यक शिक्षणाच्या पदवीला मायदेशात मान्यता मिळणार नसल्याची ताकीद संबंधित भारतीय अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना दिली आहे. अलीकडच्या काळात भारतीय विद्यार्थी मोठ्या संख्येने चिनी वैद्यक शिक्षणसंस्थांमध्ये जात असल्याने तेथील पायाभूत सुविधांवर ताण येत असल्याबद्दल भारतीय विद्यार्थ्यांविरूद्ध तक्रारीचा सूर व्यक्त होत होता. चिनी वैद्यकीय महाविद्यालयांमधील अभ्यासक्रम आणि प्रशिक्षणक्रमाला मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाने मान्यता दिली असल्याची आपल्याला अद्याप माहिती नाही, असे तेथील भारतीय दुतावासाने स्पष्ट केले आहे.

भारतीय विद्यार्थ्यांच्याही चिनी वैद्यकीय महाविद्यालयांबाबत अनेक तक्रारी आहेत. त्या अशा की, प्रवेश घेताना महाविद्यालयाने हमी दिली असली तरी काही चिनी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अर्हताप्राप्त शिक्षक नाहीत, तर सराईत इंग्रजी बोलू शकणारे विद्यार्थीही नाहीत. भारतीय विद्यार्थ्यांच्या समस्येच्या निराकरणासाठी संबंधित चिनी वैद्यक विद्यापीठ तसेच चिनी शिक्षण मंत्रालयाकडे यासंबंधी पाठपुरावा करीत असल्याची माहिती भारताचे चीनमधील राजदूत नलिन सुरी यांनी दिली. शेकडो भारतीय विद्यार्थ्यांनी चीनमधील तायेन्जिन मेडिकल युनिव्हर्सिटी, हुबेई प्रदेशातील थ्री जॉर्जेस युनिव्हर्सिटी, हेन्नान प्रदेशातील क्झिंगक्सियन युनिव्हर्सिटी तसेच नान्जिग आणि सुझोऊ या शिक्षणसंस्थांकडे धाव घेतली आहे.

पीटीआय